# विपश्यना

साधक

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. 30/-
आजीवन शुल्क रु. 500/-

बुद्धवर्ष २५५८, माघ पौर्णिमा, ३ फेब्रुवारी २०१५, वर्ष १, अंक १०

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


## धम्मवाणी

असेवना च बालानं, पण्डितानञ्च सेवना।
पूजा च पूजनेय्यानं, एतं मंगलमुत्तमं॥
*मंगल सुत्त॥ १॥*

दुर्जनांच्या संगतीपासून दूर राहाणे, संतांची संगत करणे आणि पूजनीय गुरूजनांचे पूजन-वंदन करणे, हे उत्तम मंगल आहे.

## कृतज्ञ आहे.

परम आदरणीय गुरूदेव,

आपले मंगलमय सान्निध्य आजही अनुभवास येत आहे. धर्माचे सान्निध्य आहे तर आपले सान्निध्य आहेच. धर्माचे सान्निध्य टिकून राहो म्हणजे आपले ही मंगलमय सान्निध्य टिकून राहिल. हाच शिव-संकल्प आहे.

किती मंगलमय आहे आपले सान्निध्य, धर्माचे सान्निध्य. जेव्हा-जेव्हा धर्म-सान्निध्य होते तेव्हा-तेव्हा आपल्या अमर्याद करुणेचे स्मरण होते आणि मन कृतज्ञतेने रोमांचित होते, भरून जाते.

मन कृतज्ञतेने भरून जाते त्या भगवान सम्यक संबुद्ध शाक्यमुनी गौतमाप्रती, ज्यांनी असंख्य जन्मात साधनामय जीवन जगून दहा पुण्य-पारमितांना परिपूर्ण केले, ज्याने न केवळ आपली स्वस्ति-मुक्ती साधू शकेल तर अनेकांच्या स्वस्ति-मुक्तिचे कारण ठरेल. अशी कल्याणकारी विद्या शोधून काढली, जिला ते जीवनभर करूण चित्ताने मुक्तहस्त देतच राहिले. त्यामुळे अगणित लोकांचे मंगल झाले.

आणि कृतज्ञतेने मन भरून जाते त्या जीवन मुक्त अर्हंतांप्रती ज्यांनी ही कल्याणकारी विद्या भगवानांकडून प्राप्त करून "चरथ भिक्खवे चारिकं, *बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानु-कम्पाय"* च्या मंगल आदेशाला शिरोधार्य करून गांवोगांवी, नगर-नगरांत, प्रदेश-प्रदेशात ह्या मुक्तिदायिनी विद्येला वाटण्यात आपले जीवन समर्पित केले.

आणि मन कृतज्ञतेने भरून जाते त्या सर्व सत्पुरूषांप्रती ज्यांनी ह्या पावन धर्म मंगेला अनेक पिढ्यांपर्यंत प्रवाहमान ठेविले.

कृतज्ञतेने मन भरून जाते त्या अर्हंत सोण आणि उत्तरप्रती ज्यांनी विदेश यात्रेच्या सर्व संकटांना सहन करून भगीरथाप्रमाणे ह्या धर्मगंगेला सुवर्ण भूमीत नेले आणि अगणित तहानलेल्यांची तहान शांत केली.

आणि कृतज्ञतेने मन भरून जाते त्या परंपरागत धर्म-आचार्यांप्रती ज्यांनी ब्रह्मदेशात गुरू-शिष्य परंपरेद्वारे ह्या विद्येला पिढ्यान-पिढ्या आपल्या शुध्द स्वरूपात कायम ठेवले. ह्यामध्ये शब्द, रंग-रूप, आकृती, कल्पना इत्यादींचे सम्मीश्रण होऊ दिले नाही. जो रस्ता स्थूल भासमान सत्याला भेदून सूक्ष्मतम परमसत्याकडे नेणारा राजपथ आहे त्याला एका स्थूल भासमान सत्याकडून दुस-या स्थूल भासमान सत्याकडे घेऊन जाणारी आंधळी गल्ली केली नाही; शुध्द रूपातच ठेवले म्हणूनच आम्हाला शुध्द स्वरूपात ही विद्या प्राप्त झाली.

आणि कृतज्ञतेने मन भरून जाते त्या पवित्र आचार्य-परंपरेच्या मागील शतकातील जाज्वल्यमान नक्षत्र लैडी सयाडोप्रती आणि सद्गृहस्थ आचार्य सयातैजीप्रती ज्यांनी ह्या उत्तरदायित्वाला किती आदर्शरूपाने निभावले.

आणि कृतज्ञतेने मन भरून जाते, गुरूदेव आपल्याप्रती, आपण एवढया करूण चित्ताने ह्या अनमोल धर्मरत्नाचे दान दिले. जर हे धर्मरत्न मिळाले नसते तर काय अवस्था झाली असती? धन-दौलतीचा संचय-संग्रह आणि सामाजिक पत-प्रतिष्ठांच्या शर्यतीत जीवन हरवून बसलो असतो. धर्माकडे कल असता तरीही कोणत्यातरी संप्रदायाच्या बेडीलाच आभूषण समजलो असतो. दुस-यांच्या अनुभूतींच्या गर्वातच जीवन घालविले असते, सत्य-धर्माच्या प्रत्यक्ष अनुभूतीचे हे सम्यक-दर्शन कोठे उपलब्ध झाले असते? कल्पनांनाच सम्यकदर्शन समजून समाधानी झालो असतो. यथाभूत दर्शनाद्वारे सम्यक ज्ञान कोठे उपलब्ध झाले असते? बौद्धिक उहापोहालाच, चर्चेलाच सम्यक ज्ञान समजून जीवन घालविले असते. कर्मकांड, पूजा-पाठ, भजन-कीर्तन किंवा स्वानुभूतीविहिन मत-मतांतरांच्या दार्शनिक मान्यतांच्या बंधनातच अनमोल मनुष्य जीवन व्यर्थ घालविले असते. आपण ह्या अनुत्तर-अनुपम धर्माचे दान देऊन मानवी जीवन सफल केले, गुरूदेव.

खरोखर अनुत्तर-अनुपमच आहे ही धर्म-साधना. किती ऋजु, किती स्पष्ट, किती वैज्ञानिक, किती मांगलिक. बंधनापासून मुक्तिकडे घेऊन जाणारी. भ्रम-मृगजळापासून विभ्रांतीकडे नेणारी, भासमान प्रकट सत्याकडून परमसत्याकडे घेऊन जाणारी. अशा अनमोल खजिन्याची निर्मलता आपल्या शुद्ध-रूपात कायम राहो. आजच्या ह्या पुण्य दिवशी हाच शिव-संकल्प आहे. कोठे कोणत्या प्रकारच्या सम्मीश्रणाच्या चुकीचा हिमालयासारखा मोठा अपराध होऊ नये. हा अनमोल खजिना आपल्या शुध्द रूपात कायम राहो आणि ह्याच्या अभ्यासाद्वारे लोकांच्या मुक्तिसाठी अमृताचा दरवाजा उघडला जावो! ह्यामध्येच आपले खरे पूजन-वंदन, आदर-सन्मान सामावलेले आहे.

विनीत धर्मपुत्र,
सत्यनारायण गोयन्का.

*(१९ जानेवारी १९७१, सयाजी ऊ बा खिन यांची पुण्यतिथी तसेच गुरुदेव श्री. गोयन्काजींची जन्म-तिथी-३० जानेवारी १९२४ च्या निमित्ताने--विपश्यना वर्ष ४२ अंक १२ वरून-साभार.)*

---

### आम्हीही कृतज्ञ आहोत!

वरील उद्गार आमचे गुरूदेव श्री. सत्यनारायण गोयन्काजींचे गुरूदेव आणि आमचे दादा-गुरु सयाजी ऊ बा खिन यांच्या प्रती

श्रध्दांजली समर्पणाच्या उद्देशाने आहेत. त्यांची पुण्य-तिथी १९ जानेवारीला आणि गुरूजींची जन्म-तिथी ३० जानेवारीला येते. पूज्य गुरूजींच्या श्रध्दांजलीला आणि कृतज्ञतेला पुढे नेत आज आम्ही त्यांच्या जन्म-तिथी निमित्ताने नतमस्तक होऊन सांगू इच्छितो---

गुरूदेव, आपल्या अमर्यादित करूणेमुळेच आम्ही विपश्यनारूपी अमृत चाखू शकलो. आम्हाला असे वाटते की जणू कांही आपण आमच्यासाठीच ब्रह्मदेशात जन्म घेतला आणि भौतिक जगतातील सर्वश्रेष्ठ प्राप्तींचा त्याग करून आपले जीवन शुध्द धर्माला समर्पित केले. आमच्यासाठीच आपल्या अत्यंत प्रिय जन्मभूमीचा त्याग करून भारताला कर्मभूमी बनविले. अनेक कष्टांना सहन करीत येथे शुध्द धर्माची ज्योत प्रज्वलित केली. धर्माला अनेकापर्यंत पोहोचवून त्यांचा जन्म-जन्मांचा अंधकार दूर केला. आमच्यासाठीच अत्यंत कठीण परिस्थितीत सुध्दा धर्माची मशाल सांभाळलीत व आमचे आदर्श बनलात. अन्तिम क्षणापर्यंत धर्मसेवा करतच राहिलात. आपण २५० पेक्षा जास्त शिबिरे घेतलीत, ज्यामध्ये दररोज केवळ सूचनाच नाही तर प्रवचन-सुध्दा दिली. कितीतरी वेळा धर्माच्या गोष्टींची पुनरावृत्ती केलीत. ४०० पेक्षा अधिक विपश्यनेची प्रेरणादायी प्रवचन दिली आणि अनेक अडचणींना सामोरे जात १८० पेक्षा जास्त विपश्यना केंद्र बनविण्याची प्रेरणा दिली, जेथे लाखो लोक आपली अनेक जन्मांची तहान शमवितात आणि शमवितच राहातील. खरोखर गुरूदेव, आपण आमच्यासाठीच जन्म घेतलात आणि आमच्यासाठीच जीवन जगलात. आपल्या ह्या अनंत उपकारांचे ऋण आम्ही कधीही चुकवू शकणार नाही. आपल्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमच्याजवळ शब्द नाहीत. ह्यासाठी आम्ही हेच म्हणू--

**---- रोम-रोम किरतग हुआ, ऋण न चुकाया जाय!..**

समस्त विपश्यी साधकगण.

## गुरूदेव श्री गोयन्काजींची जन्म-जयंती

सयाजी ऊ बा खिन यांच्याप्रती पूज्य गुरुजींची भावयुक्त कृतज्ञता आणि श्रध्दांजली याप्रमाणेच त्यांच्या स्वतःच्या जन्म-जयंती (३० जानेवारी १९२४) च्या शुभ-वेळी आम्हीसुध्दा अशाच प्रकारे आपली कृतज्ञता प्रकट करीत त्यांच्या शिव-संकल्पांना शुध्द स्वरूपात ठेवण्याचा संकल्प करू, धर्माचे जीवन जगण्यासाठी साधनेचा नियमित अभ्यास करू, आपल्या आचरणाला पवित्र राखू आणि वाद-विवादापासून दूर राहून शुध्द धर्माचे प्रतिपादन करीत राहू. ही माहिती जाणून मन प्रसन्न झाले की वर्ष २०१३ मध्ये दहा दिवसांची एकूण ९२१ शिबिरे झाली आणि त्यात एकूण ४९,१७० साधक-साधिका लाभान्वित झाले. सर्व साधक-साधिका धर्मात परिपक्व होत राहोत. ह्यातच सर्वांचे मंगल-कल्याण सामाविलेले आहे.

आशिर्वादासह
इलायचीदेवी गोयन्का.

## इतिपि सो भगवा लोकविदू

-- ते भगवान लोकविदू (सर्व लोकांना जाणणारे) आहेत.

**लोकं विदती जानातीति लोकविदू--**

ज्याला लोक माहित आहेत, जो लोकांना जाणतो, तो लोकविदू. किती आहेत हे लोक?

**चार** अधोगतीचे लोक-- निरय, असुर, प्रेत, तिर्यक (पशु-पक्षी) **एक** मनुष्य लोक.

**सहा** देवलोक--चातुर्महाराजिक, त्रायस्त्रिंश, याम, तुषित, निर्माणरति, परनिर्मित वशवर्ती.

**सोळा** रूप ब्रह्मलोक--ब्रह्मपारिषद, ब्रह्मपुरोहित, महाब्रह्मा, परित्ताभ, अप्रमाणाभ, आभास्वर, परित्रशुभ, अप्रमाण शुभ, शुभकृत्स्न, बृहत्फल, अविहा, अतप्य, सुदर्श, सुदर्शी, असंज्ञसत्ता, अकनिष्ठक.

**चार** अरूप ब्रह्मलोक--आकाशानन्त्यायतन, विज्ञानानन्त्यायतन, आकिञ्चन्यायतन, नैवसंज्ञानासंज्ञायतन.

अशाप्रकारे एकतीस लोक होतात-ह्यापैकी पहिले अकरा कामभोगाचे लोक आहेत. ब्रह्मलोक ब्रह्मचरणाचे लोक आहेत. तेथे कामभोग नसतात. रूप ब्रह्मलोकात रूप (शरीर) आणि नाम (मन) ह्या दोघांचे आस्तित्व असते, परंतु अरूप ब्रह्मलोकात रूप नसते, फक्त नाम असते. आज रूप शब्द सौंदर्य किंवा आकृती ह्या अर्थात प्रचलित आहे. परंतु त्या काळांतील भाषेत रूप भौतिक पदार्थांना देखील म्हणत होते. आज नामचा अर्थ केवळ नामकरण असा राहिला. याचा उपयोग एखाद्यास हाक मारणे, ओळखणे यासाठीच केला जातो. परंतु त्या काळातील भाषेत नाम चित्तालासुध्दा म्हणत होते. मनुष्य आणि पशूलोकात भरीव, ठोस भौतिक शरीर असते, पण अधोगतीच्या कांही लोकात आणि देव व ब्रह्मलोकातील प्राण्यांचे शरीर भरीव नसते, ते वायवीय असते, परंतु असते भौतिकच. केवळ अरूप ब्रह्मलोकातील प्राणी भौतिक शरीरधारी नसतात. त्यांचे शरीर सूक्ष्म वायवीय सुध्दा नसते. ते केवळ नाममय म्हणजे चित्तमय प्राणी असतात. अशाच प्रकारे असंज्ञसत्ता ब्रह्मलोकात फक्त रूपमय प्राणी असतात.

अन्य एका गणतीत एक कामलोक, दुसरा रूप-ब्रह्मलोक, आणि तिसरा अरूप-ब्रह्मलोक हे तीनच लोक गणले जातात.

दुस-या एका गणतीत सर्व विश्व ज्या शून्य आकाशांत स्थित आहे त्याला आकासलोक, कारण की त्यात प्राणी अस्तित्वात आहेत म्हणून ते सत् (सत्व) लोक आणि त्यात संस्कारांची तरंगे सामावलेली आहेत म्हणून संङ्खारलोक, हे तीन लोक म्हटले जातात.

साधारणपणे मनुष्यलोकास इहलोक म्हणतात आणि दुस-या सर्व लोकांना परलोक म्हणतात. साधना क्षेत्रात नाम आणि रूपाच्या सर्व क्षेत्राला लोक म्हटले आहे. ह्यात सर्व एकतीस लोकांचा समावेश आहे.

कांही कां असेना, कशा प्रकारेही गणती करा, या सर्व लोकांच्या बाबतीत ज्याला संपूर्ण सत्य माहित आहे, त्यालाच लोकविदू म्हणतात. याविषयी पूर्ण माहिती ख-या अर्थी त्यालाच होते जो ह्या एकतीस लोकांचे संशोधन पूर्ण करून त्यांना पूर्वपणे जाणून, त्या पलिकडील लोकातीत निर्वाणाचा साक्षात्कार करील म्हणजेच लोकन्तगू होईल. लोकन्तगू झाला तरच ख-या अर्थाने लोकविदू होतो नाही तर भ्रम-भ्रांतीतच अडकून राहातो.

## लोकांच्या पलीकडे कसे जाणार?

प्राचीन काळी रोहिताश्व नावाचा एक ऋषी होता. तो मृत्युनंतर देवलोकांत जन्मला. भगवानांच्या जीवनकाळात अनेक देव, ब्रह्मा भगवानांना भेटण्यास येत असत आणि त्यांना धर्मविषयक प्रश्न विचारत असत. एकदा भगवान अनाथपिंडिकाच्या जेतवनात विहार करीत होते तेव्हा रोहिताश्व देव रात्रीच्या वेळी सा-या जेतवनाला आपल्या प्रकाशाने प्रकाशित करीत भगवानांना भेटण्यास आला. त्याने भगवानांना प्रश्न विचारला की सर्व लोकांच्या पलिकडील त्या अवस्थेपर्यंत चालत-चालत पोहोचू शकतो कां, की जेथे जन्म नाही व मृत्युही नाही, जेथे पतन होत नाही व उत्पत्तीही होत नाही?

भगवानांनी सांगितले--नाही. चालत-चालत त्या अवस्थेपर्यंत पोहोचू शकत नाही, तरीसुध्दा मुक्तिसाठी त्या अवस्थेपर्यंत पोहोचणेही अत्यंत अनिवार्य आहे.

रोहिताश्व देव हे ऐकून प्रसन्न झाला, कारण त्याच्या मनुष्य जीवनांत त्याने योगाच्या सामर्थ्याने सिध्दी प्राप्त केल्या होत्या. त्या सिध्दींच्या आधारावर तीव्र गतीने चालत-चालत लोकांच्या पलिकडील अवस्थेपर्यंत पोहोचण्याच्या निष्फल प्रयत्नात त्याने आपले सारे जीवन घालविले होते. तेव्हा भगवानांनी समजावले--

**इमस्मिंयेव ब्याममत्ते कळेवरे ससञ्ञिम्हि समनके--**

ह्या साडेतीन हात लांब असलेल्या संज्ञायुक्त शरीरात--

**लोकञ्च पञ्ञापेमि, लोकसमुदयञ्च, लोकनिरोधञ्च, लोकनिरोधगामिनिञ्च पटिपदन्ति।** *(अ० नि० १.४.४५, रोहितस्ससुत्त)*

- मी लोकांना जाणतो, लोक-समुदयाला, लोक-निरोधाला, आणि लोक-निरोध करण्याच्या मार्गालाही.

भगवानांनी स्वतः लोकोत्तर अवस्था प्राप्त केली असल्यानेच ते लोकांना जाणू शकत होते. दुसऱ्या एका प्रसंगी भगवानांनी सांगितले-

भिक्षूंनो, तथागतांनी लोक जाणला आहे. तथागत लोकापासून मुक्त आहेत. भिक्षूंनो, तथागतांनी लोक-समुदय म्हणजे लोकांची उत्पत्ती जाणली आहे. तथागतांची लोकातील उत्पत्ती नष्ट झाली आहे, समाप्त झाली आहे.

भिक्षूंनो, तथागतांनी लोक-निरोध जाणला आहे. तथागतांनी लोक-निरोधाचा साक्षात्कार केला आहे. तथागतांनी लोक-निरोधगामिनी प्रतिपदा (निवारण करण्याच्या मार्गालाही) जाणली आहे. म्हणजेच लोक-निवारण करण्याचा मार्ग भावित केलेला आहे, त्याचा अनुभव घेतला आहे.

सगळ्या लोकांच्या पलिकडील अवस्था मिळविण्यासाठी साऱ्या लोकांचे परिपूर्ण ज्ञान म्हणजे परिज्ञान, अभिज्ञान होणे आवश्यक आहे. लौकिक क्षेत्राच्या पलिकडील अवस्था ती व्यक्ती कशी पार करू शकेल जिने समस्त लौकिक क्षेत्राचे परिपूर्ण यथाभूत ज्ञान प्राप्त केले नाही? अनुभूतीच्या स्तरावर असे ज्ञान प्राप्त केल्यानंतरच कोणी व्यक्ती सर्व लोकापासून विमुक्त होते. तेव्हाच त्यापासून अलिप्त होते. तेव्हा म्हटले गेले--

**सब्बं लोकं अभिञ्ञाय, सब्बं लोके यथातथं।.....**

सर्व लोकांना अभि-ज्ञानाने जाणून, सर्व लोकांना जशेच्या तसे (यथातथ्य) जाणून, सर्व लोकांपासून निर्बंध, सर्व लोकांपासून अलिप्त अशी जी व्यक्ती सगळा लोकप्रपंच स्वतःच्या अनुभवाने जाणून, त्यापासून विमुक्त झाली, निर्लिप्त झाली, ती व्यक्ती खऱ्या अर्थाने लोकविदू आहे. तीच सर्वजित आहे.

**स वे सब्बाभिभू धीरो, सब्बगन्थप्पमोचनो।**
**फुट्ठस्स परमा सन्ति, निब्बानं अकुतोभयं॥**

*(अ० नि० १.४.२३, लोकसुत्त)*

तो धीर पुरुष सर्वांना पराजित करतो. तो सर्व ग्रंथींपासून विमुक्त आहे. त्याने निर्वाणिक परम शांतीला स्पर्श केला आहे आणि भय-मुक्त झाला आहे.

अशा लोकविदूला लोकांबद्दल आणि लोकमुक्त होण्याविषयी काय भय आणि काय संशय राहील? जेव्हा लोकांच्या अंतिम टोकाला जाणून त्याच्या पुढे निघून जाईल, सगळ्या लौकिक क्षेत्राच्या पलिकडील लोकातील निर्वाणाचा स्वतः साक्षात्कार करून घेईल, तेव्हाच असे होईल.

**तस्मा हवे लोकविदू सुमेधो, लोकन्तगू वुसितब्रह्मचरियो।**
**लोकस्स अन्तं समिताविं ञत्वा, नासीसती लोकमिमं परञ्चाति॥**

*(अ० नि० १.४.४५, रोहितस्ससुत्त)*

म्हणून जो लोकविदू आहे, सुप्रज्ञ आहे, लोकाचा अंत जाणणारा आहे, ज्याने ब्रह्माचरण पूर्ण केले आहे (तो) समतेच्या आधारावर लोकाचा अंत जाणून इहलोकात किंवा परलोकात कोठेही आसक्त होत नाही

खरोखर जो सर्व लोकप्रपंचाला जाणतो तो लोकांविषयी आसक्त होवू शकत नाही. कोणी व्यक्ती लोकविदू तेव्हाच होते, जेव्हा ती लोक स्वभावाला जाणते, लोकांच्या उत्पत्तीला जाणते, लोकांच्या निरोधाला जाणते, लोक निरोधाच्या उपायांना जाणते. ह्या चौघांना आपल्या शरीराच्या आतच जाणते.

*(विश्व विपश्यनाचार्य श्री सत्यनारायण गोयन्कांनी लिहिलेले पुस्तक ''तिपिटक मे सम्यक संबुध्द'' भाग-२/४ मधून-साभार)*

---

## केंद्रासंबंधी सूचना

### ''धम्म-कांची'' कांचीपुरम, तामिळनाडू

कांचीपुरमच्या धम्म गृहाचे नाव "धम्म-कांची" ठेवले गेले आहे. येथे फक्त १, २ आणि ३ दिवसांची शिबिरे होतील, तसेच मिनी आनापानाच्या अभ्यासाबरोबरच विपश्यनेसंबंधी साहित्य तसेच भावी शिबिर कार्यक्रमांची माहिती दिली जाईल. संपर्क ईमेल- kanch.dhamma@gmail.com

### धम्म पीठ, अहमदाबाद

येथे ७८ नव्या शून्यागारांच्या निर्माणाच्या कार्यास आरंभ झाला आहे. यामुळे सर्व साधकांना तप करण्यासाठी शून्यागार उपलब्ध होतील. १०० साधकांसाठी निवास इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. शून्यागार निर्माणात पुण्यार्जन इच्छूक व्यक्तीसाठी बँक व्यवहार-- ''गुर्जर विपश्यना केंद्र'' **HDFC Bank a/c.0069762000, 0060, IFSC Coad- HDFC0000069** उपलब्ध आहे. कृपया आपले पूर्ण नांव व पत्ता लिहून धम्मपीठाच्या पत्त्यावर संपर्क करावा.

### धम्मचक्क विपश्यना केंद्र, सारनाथ

येथे ५० शून्यागार असलेल्या पगोडाच्या निर्माण कार्यास आरंभ झाला आहे. पुण्यार्जनाच्या इच्छूकांसाठी बँक व्यवहार. ''धम्मचक्क विपश्यना ध्यान केंद्र'', **Canara Bank a/c. 1191101014796, IFSC coad- CNRB0001191** उपलब्ध आहे. कृपया पूर्ण नाव व पत्ता लिहून केंद्राच्या पत्त्यावर संपर्क करावा

### धम्मपालि विपश्यना केंद्र, गुजरात

धम्मपालि, पालिताना विपश्यना केंद्र भावनगर जवळ गुजरातमध्ये निर्माणाधीन आहे. जवळ-जवळ ४८ साधकांसाठी निवासस्थान इत्यादींच्या सुविधा तयार आहेत आणि आता अनेक महत्वपूर्ण इमारती बनविणे बाकी आहे. येथे १४ डिसेंबर २०१४ ला पहिले एक दिवसाचे शिबिर संपन्न झाले. अधिक माहिती साठी पुण्यार्जन इच्छूकांनी संपर्क करावा. भावनगर विपश्यना केंद्र द्वारा श्री प्रफुलभाई तसेच गीताबेन मेहता, ४०१ ''आराधना'' मेघानी सर्कल, भावनगर फोन नं. ९१-९४२७५-६०५९४, किंवा श्री अनिल शाह, ०९४२७२-३२१४५. ई-मेलः nitesh@kothariworld.com; for **banking:** 'Bhavnagar Vipashyana Centre' Kotak Mahindra Bank, Bank A/c.6411183455, IFSC Code: KKBK0000891. ➔

---

### अतिरिक्त उत्तरदायित्व भिक्षु आचार्य

1. Ven. Bhikkhu Badullawala Seelaratana, Sri Lanka- समन्वयक क्षेत्रीय आचार्यांची सेवा, श्रीलंका

### नवे उत्तरदायित्व आचार्य

१. श्री एम. ए. सुब्रमनियम, केंद्र आचार्यांची सेवा- धम्म अरुणाचल, तमिलनाडू

### वरिष्ठ सहायक आचार्य

1-2. Mr. Dong Hwang Lee & Mrs. Jeong Soo Lee, South Korea
3-4. Mr. Itamar Soffer & Mrs. Jung Im Jung, South Korea

### नव नियुक्ती सहायक आचार्य

१-२. श्री देवीचरण व श्रीमती उमरावती कुशवाहा, गाजीपूर
३. श्री महेश वाळवेकर, कोल्हापूर
४. श्री गोविंदभाई लेवा, अहमदाबाद
५. श्री विपिन प्रकाश मंगल, अहमदाबाद
६. श्रीमती उर्वशी पटेल, अहमदाबाद
७. श्री नोरबू भूटिया, सिक्किम
८. कु. चंदा आशर, मुंबई
९. श्री विश्व मित्तर मुसाफिर, हमीरपूर
१०. श्री राम मंगल सिंह, फतेहपूर
११. श्रीमती नीरा कपूर, दिल्ली
१२. कु. संदीप कौर विर्क, करनाल
13. Mrs.Narin PO, Combodia
14. Mrs. Nary POC, Combodia

### बाल-शिबिर शिक्षक

१. श्रीमती आशा वानखेडे, यवतमाल
२. श्री हर्षनंद इंगोले, यवतमाल
३. श्रीमती प्रभा तलवारे, यवतमाल
४. डॉ. राजकुमार भगत, यवतमाल
५. श्री ब्रह्मपाल चौरे, भंडारा
६. श्री कुलदीप बागडे, भंडारा
७. श्री सुरेश मेश्राम, भंडारा
८. श्री दादाराव तायडे, अकोला
९. श्री जनार्दन भगत, वाशिम
१०. श्री सम्राट लोखंडे, वर्धा
११. श्रीमती सुनीता नागदिवे, अमरावती
१२. श्रीमती वर्षा गजभिये, नागपूर
१३. श्रीमती रसिल्काबेन वाघेला, जामनगर
१४. श्रीमती ऊषा भोसले, खारघर
१५. श्रीमती सरस्वती रामदास, खारघर
१६. श्री रमेश काटे, रायगढ़
17. Ms Puttiporn Yongnate, Thailand
18. Mrs Emika Angkanasirikul, Thailand
19. Mrs. Kanoknipa Titakarnasirikul, Thailand

**Registered No. NSK/271/2014-2016**

**धम्म भुवनेश्वर, उडीसा**

येथे सध्या स्वयंपाकघर, भोजनालय, शौचालय इत्यादींचे काम सुरू आहे. धम्महॉल, आचार्य निवास आणि पुरूष-महिला निवास, डॉरमिटरी इत्यादींची सुरूवात करावयाची आहे. पुण्यार्जन इच्छूकांनी संपर्क करावा-- श्री. सी. आर. कर. मो. ९४३७१३१०१९, ०६७४-२३५४२०७ किंवा श्री डी. एल. दास. मो. ९४३८०१२१६६, ईमेल- vipassanabbsr@gmail.com; and SBI a/c 32758805428, IFSC code- SBIN0012018 है।

**पालि प्रशिक्षण कार्यक्रम- २०१५, विपश्यना विशोधन विन्यास, ग्लोबल विपश्यना पगोडा, मुंबई**

- ⇨ पालि वाचणे-लिहिणे शिकणे (बर्मी, रोमन तसेच देवनागरीत) -- १० ते १९ मे.
- ⇨ पालि-इंग्लिश सघन निवासी पाठ्यक्रम -- २५ मे ते ९ ऑगस्ट.
- ⇨ अनुवाद करण्यासाठी कार्यशाळा -- १० ते १७ ऑगस्ट.
- ⇨ अशोकाचे शिलालेख तसेच बर्मी लिपी कार्यशाला -- १ ते ५ ऑक्टोबर
- ⇨ उच्च पालि-व्याकरण कार्यशाळा -- ३ ते १४ नोव्हेंबर
- ⇨ शोध-प्रणालीवर कार्यशाळा-- १५ ते १९ नोव्हेंबर

**उपरोक्त कार्यक्रमात भाग घेण्यासाठी पात्रता (योग्यता)**

अ) ज्यांनी कमीतकमी ३ - दहा दिवसांचे तसेच एक सतिपट्ठान शिबिर केलेले आहे.
ब) स्नातक डिग्री किंवा १५ वर्षापर्यंत शाळेचा पाठ्यक्रम पूर्ण केला आहे.
स) अनुवाद आणि पालि-व्याकरणसाठी- ज्यांनी वि. वि. वि द्वारे संचालित निवासी पालि पाठ्यक्रम पूर्ण केलेला आहे किंवा पालिमध्ये स्नातकोत्तर डिग्री प्राप्त केलेली आहे.

**विन्यास ने खालील विषयावर शोधाचे आयोजन केले आहे--**

१) संत-वाणीत विपश्यना. २) तिपिटकात आयुर्वेदिक तत्त्व.
३) विपश्यनेमुळे बदल --तेव्हा आणि आता.

जर कोणी ह्या विषयावर कांही काम केलेले असेल तर तर त्यांचे स्वागत आहे संपर्क-- ईमेल- **mumbai@vridhamma.org;** फोन- **+91-22-33747560.**

**आवश्यकता आहे.**

ग्लोबल पॅगोडा परिसराच्या सुरक्षिततेसाठी एका योग्य अनुभवी अधिका-याची आवश्यकता आहे. आर्मीमधील निवृत्त व्यक्तीला प्राधान्य दिले जाईल तसेच ज्याने साधना केलेली आहे किंवा साधनेस उत्सुक आहे. कृपया आपला बायोडाटा आणि ओळख-पत्रासह ग्लोबल पगोडाच्या व्यवस्थापकाशी संपर्क करावा. श्री आर. के. अग्रवाल, मो. 09324216214, ईमेल- rkagarwal.vri@globalpagoda.org

----------------

**अस्थी अवशेष सूचना कक्ष.**

ग्लोबल विपश्यना पगोडा बोरीवलीच्या परिसरात एक सूचना कक्ष भगवान बुध्दांच्या शरीर-धातूं (अस्थी-अवशेष) (Relics) च्या वर्तमान स्थळांच्या माहितीसाठी आरक्षित केला आहे. त्यामुळे पाहुण्यांना ही माहिती मिळू शकेल की भगवान बुध्दांचे शरीर-धातू कोठे-कोठे सुरक्षित ठेवलेले आहेत. ह्या कक्षाचे उद्घाटन १८ जाने. रोजी झाले.

**पुढील बुध्द पौर्णिमेच्या शुभ दिवशी एक दिवसाचे महाशिबिर --**

**४ मे २०१५ रोजी "ग्लोबल विपश्यना पगोडा" मध्य पूज्य माताजींच्या सान्निध्यात एक दिवसाचे महाशिबिर होणार आहे. शिबिराची वेळ** सकाळी **११** वाजेपासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत. ३ वाजताच्या प्रवचनात साधना न केलेले लोकही बसू शकतात. बुकिंगसाठी कृपया खालील फोन क्रमांकावर किंवा ईमेलद्वारे ताबडतोब संपर्क करावा. कृपया बुकिंग न करता कोणीही येऊ नये आणि **समग्गानं तपोसुखो**-- सामुहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. **संपर्कः** 022-28451170 022-337475-01/43/44- Extn. 9, **(फोन बुकिंग** ११ ते ५ वाजेपर्यंत दररोज) **Online Regn.: www.oneday.globalpagoda.org**

**दोहे धर्माचे**

शुद्ध धर्माचा शांति पथ. संप्रदाय असे दूर।
शद्ध धर्माची साधना, मंगलाने भरपूर।।

सत्य धर्माला कल्पना, दूषित देय बनवून।
एक थेंब कांजीने, मण भर दूध फाटून।।

रूप शब्द रस गंधात. सतत सघनता होय।
विपश्यनेनेच चिरले. त्वरित विघटन होय।।

जेथे जेथे सघनता, तेथे मोहच होय।
मायेचा भ्रम चाले, अहम् स्थापित होय।।

धर्म-गंगा निर्मल रहे, मळ न मिश्रित होय।
जन जन चे होवो भले, जन जन मंगल होय।।

**दोहे धर्माचे**

संतांची संगत सुखद, दुखद दुष्टांची होय।
वंदन गुरूजनांना सुखद, मंगलकारी होय।।

सदगुरूची संगत मिळे, मिळे धर्माचे सार।
संप्रदायाच्या ओझ्याचा, उतरे डोईचा भार।।

सदगुरूची कृपा झाली, उभरण्यास न वेळ।
दुःख, दारिद्रयच मिटे, घडे रत्नांशी मेळ।।

जर सद्गुरू तू राजपथ, नसे दिला दाखवून।
तर जीवन भर भटकतो, आंधळ्या बोळातून।।

अहो भाग्य, गुरूदेवजी, प्रज्ञा दे जागवून।
दर्शन वाद-विवादाचे, बंधन दे सोडवून।।

**श्री गोयन्काजी व विपश्यनेप्रती असीम कृतज्ञतेसह**
Email: - thetriplegems@gmail.com

'विपश्यना विशोधन विन्यास' साठी प्रकाशक, मुद्रक एवं संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी, इगतपुरी-422 403, दूरध्वनी : (02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अक्षर चित्र प्रिंटिंग प्रेस, 69- बी रोड, सातपुर, नाशिक-422 007. **बुद्धवर्ष 2558,** **माघ पौर्णिमा,** **३ फेब्रुवारी २०१५**

**वार्षिक शुल्क** रु. **30/-,** US $ 10, **आजीवन शुल्क** रु. **500/-,** US $ 100. **Registered No. NSK/271/2014-2016**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712,
243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org